
Government of Maharashtra

महाराष्ट्र शासन

MAITRI

# आता घडेल नवा समृद्ध महाराष्ट्र!


# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना CMEGP



## स्वयंरोजगारास देई आधार, हेच आपले सरकार!

**राज्य शासनाच्या भक्कम सहकार्याने तरुण/तरुणींना उद्योजक बनण्याची सुवर्णसंधी**

**राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नाविन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सुक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देणेसाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होणेसाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना जाहिर केली आहे.**



# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP)

# Chief Minister Employment Generation Programme (CMEGP)

## स्वयंरोजगारास देई आधार, हेच आपले सरकार !

### उद्देश :

- राज्यातील युवक/ युवतींच्या सर्जनशिलतेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सुक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होणेसाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे.

### पात्रता अटी :

- राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करु इच्छिणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती/ जमाती/ महिला/ अपंग/ माजी सैनिक/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त व भटक्या जमाती/ अल्पसंख्यांक) ५ वर्षाची अट शिथिल.



- रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रु.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास.

- अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या / महामंडळांच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

### प्रकल्प मर्यादा किंमत :



- प्रकिया व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु.५० लाख व सेवा / कृषी पूरक उद्योग / व्यवसाय प्रकल्पांसाठी कमाल रु.२० लाख.

### योजना अंमलबजावणी यंत्रणा :



अ) शहरी भागासाठी : जिल्हा उद्योग केंद्र

ब) ग्रामीण भागांसाठी : जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय

एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

### पात्र मालकी घटक :

वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट, एकल मालकी कंपनी (OPC) व मर्यादित दायित्व संस्था (LLP).

प्रकल्प खर्च उभारणी व राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य (मार्जिन मनी-अनुदान) :

(मंजूर प्रकल्प किंमतीनुसार)

| प्रवर्ग | स्वगुंतवणूक | अनुदान | | बँक कर्ज | |
|---|---|---|---|---|---|
| | | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण |
| सर्वसाधारण | १०% | १५% | २५% | ७५% | ६५% |
| विशेष प्रवर्ग (अनुसूचित जाती/ जमाती/ महिला/ अपंग/ माजी सैनिक/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त व भटक्या जमाती/ अल्पसंख्यांक) | ५% | २५% | ३५% | ७०% | ६०% |


## बँक/ वित्तीय संस्था यांचा सहभाग :

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत स्वंय गुंतवणूक व राज्य शासनाचे (अनुदान स्वरुपातील) आर्थिक सहाय्य याव्यतिरिक्त आवश्यक ६० ते ७५% टक्के अर्थसहाय्य बँकांमार्फत उपलब्ध होईल. राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेडयुल्ड बँका, खाजगी बँका व १४ जिल्हयांतील मध्यवर्ती सहकारी बँका इत्यादी मार्फत बँक कर्ज उपलब्ध होईल.**

## लाभार्थी निवड :

**मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची संपूर्ण: ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी होईल. यासाठी विशेष CMEGP पोर्टल अर्जदारांसाठी उपलब्ध असेल. अर्जदारांनी अर्ज केल्यानंतर जिल्हा स्तरावरील स्थापित कार्यबल समितीच्या छाननीअंती मान्यता दिलेले प्रस्ताव संबंधित बँकांना शिफारस करण्यांत येतील. बँकांमार्फत प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासून प्रकल्प मंजूरी व कर्ज मंजूरीबाबत बँक निर्णय घेईल. बँक मंजूरीच्या अनुषंगाने मंजूर प्रकल्प किंमतीस पात्र असणारे अनुदान संबंधित कर्ज खात्यात राज्य शासनाच्या तरतूदीतून वितरीत होईल. राज्य शासनाचे अनुदान ३ वर्ष कालावधीसाठी LOCK-IN राहील. प्रकल्प यशस्वीरित्या अंमलबजावणी झाल्याची खात्री झाल्यानंतर राज्य शासनाचे अनुदान वितरीत होईल. संपूर्ण प्रकिया ही ऑनलाईन असल्याने अर्जदारांना कार्यालयात भेटी देण्याची आवश्यकता नाही.**







## प्रशिक्षण :

**योजनेंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजुर झालेल्या अर्जदारांसाठी नि:शुल्क निवासी स्वरुपाचे उद्योजकीय प्रशिक्षण शासन मान्य संस्थांच्या सहयोगाने आयोजित करण्यात येईल. सदर प्रशिक्षण, उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पांसाठी २ आठवडे व सेवा, कृषी पूरक उद्योग, व्यवसायांसाठी १ आठवडा मुदतीचे असेल. कर्ज वितरणापूर्वी सदर प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.**

**सदर प्रशिक्षणात उद्योजकीय व्यक्तीमत्व विकसित होणारे, क्षमतावृध्दी व आत्मविश्वास वाढविणारे, विविध विषय तज्ञांचे मार्गदर्शन, उद्योग भेटी, यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन इ. प्रमुख बाबींचा समावेश असेल.**

## सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे: (अ)

- जन्म दाखला/ शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / वयाचा पुरावा
- शैक्षणिक पात्रते संबंधिचे कागदपत्रे / प्रमाणपत्रे.
- आधार कार्ड
- नियोजित उद्योग / व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (साध्या कागदारील प्राथमिक संमती), बँक मंजूरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल.
- जातीचे प्रमाणपत्र (एस.सी/ एस.टी.प्रवर्ग/ इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त व भटक्या जमाती/ अल्पसंख्यांक)
- विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक)
- वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना.
- स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking)

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना CMEGP

**(ब) संगणकीय प्रणालीवर (CMEGP PORTL) आवश्यक माहिती नोंदविल्यास प्रकल्प संकीर्ण अहवाल तयार होईल. त्याची प्रत उपरोक्त कागदपत्रांसोबत अर्जासमवेत सादर करावी.**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम - अर्ज व प्रकल्प उभारणींतर्गत टप्पे:







जिल्हा स्तरावर CMEGP पोर्टलवर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे ऑनलाईन अर्ज सादर.

↓

महाव्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावांची छाननी, प्राथमिक पात्र प्रस्तावांची यादी.

↓

जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रस्तावांची अंतिम निवड व विविध बँकांना कार्यक्षेत्रनिहाय कर्ज प्रस्तावांची शिफारस.

↓

बँकस्तरावर प्रस्तावाची आवश्यक शहानिशा कर्ज प्रस्ताव मंजूरीबाबत बँकेकडून अंतिम निर्णय.

↓

प्रस्तावास बँक मंजूरी असल्यास बँकेकडून सादर शासनाच्या अनुदान (मार्जिनमनी) प्रस्तावाची उद्योग संचालनालयाकडून छाननी व मंजूरी. उद्योग संचालनालयाच्या मान्यतेनंतर नोडल बँके द्वारा संबंधित बँकेस अनुदान वितरण निर्देश.

↓

अर्जदारांनी स्वत:ची ५ ते १० टक्के रक्कम उपलब्ध केल्यावर व आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मंजूर रक्कमेचे पूर्ण कर्ज वितरण.

↓

प्रकल्प उभारणी व कायान्वयन

↓

३ वर्ष प्रकल्प यशस्वीपणे अंमलबजावणी झाल्यानंतर शासनाच्या अनुदानाचे अर्जदाराच्या कर्ज खात्यात समायोजन (Settlement of Claim).

## उद्योग विभागामार्फत राबविण्यांत येत असलेल्या सूक्ष्म, लघु घटकांसाठी इतर महत्वपूर्ण योजना/उपक्रम:-

१. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम.

२. सुधारीत बीज भांडवल योजना.

३. जिल्हा उद्योग केंद्र योजना.

४. महाराष्ट्र राज्य सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना.

५. केंद्र शासनाची सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना.

६. महिला उद्योजकता प्रोत्साहन योजना.

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती / जमाती उद्योजकता प्रोत्साहन योजना.

८. निवासी /अनिवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम.

९. काथ्या (Coir) प्रोत्साहन योजना.

१०. औद्योगिकदृष्टया अविकसित भागातील उद्योगांना प्रोत्साहन देणारी सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१९

११. माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान पूरक सेवा तसेच उद्योग क्षेत्रनिहाय/संवर्गनिहाय इतर योजना

१२. उद्योगांच्या अडीअडचणी तसेच आवश्यक परवाने /दाखले ऑनलाईन उपलब्ध होणेसाठी मैत्री कक्ष सुविधा उपक्रम.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना
CMEGP



# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP)

महाराष्ट्र शासन

MAITRI

## धोरण रोजगार निर्मितीचे
## धोरण प्रगत महाराष्ट्राचे

१. उद्योजकतेस प्रोत्साहन देणारा व्यापकरोजगार निर्मितीला राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम

२. रु. ५० लाखांपर्यंतचे प्रकल्प योजनेंतर्गत पात्र

३. सेवा-उद्योग, कृषी पूरक तसेच उत्पादन प्रकारचे उद्योग/व्यवसाय पात्र

४. राज्य शासनाचे मार्जिन मनी अनुदान १५% ते ३५%

५. महिलांसाठी ३०% उद्दिष्ट राखीव

६. वय मर्यादा १८ ते ४५ वर्ष, विशेष प्रवर्गासाठी ०५ वर्ष शिथिल




अधिक माहिती व संपर्कासाठी :

**राज्यस्तरीय संनियंत्रण :**
**विकास आयुक्त (उद्योग)**, उद्योग संचालनालय,
नविन प्रशासकीय इमारत, २ रा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

SCAN ME

**हेल्पलाईन नंबर : १८६०२३३२०२८/०२२ - २२६२३६१/०२२-२२६२२३२२.**

**महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र** (संबंधित जिल्हा)
**जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी** (संबंधित जिल्हा)

संकेतस्थळ
**www.maitri.mahaonline.gov.in**
**www.di.maharashtra.gov.in**